भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये    Rs. 100

रु. 100    ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA    ◐ 2024 ◐    36AB 854810

TREASURY OFFICE SATARA

- 7 JAN 2025

STAMP HEAD CLERK

अनुक्रमांक.............दिनांक.............रुपये.............

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे.............

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र.............

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव............. प्रभारी प्राचार्य

संपूर्ण पत्ता............. आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे, ता. व जि. सातारा

हस्ते व्यक्तीचा संपूर्ण नांव.............

पत्ता.............

(श्री. शेखर रामचंद्र जाधव)
७१, राजाचा गोट, सातारा.
परवाना क्र. २३०१००६
दु. नि. का. सातारा क्र. १
मुद्रांक विक्रेता

मुद्रांक धारकाची / हस्ते व्यक्तीची सही

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

## आणि

## आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे, ता व जि. सातारा.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हा विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञान प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध

विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौद्धिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या संशोधन निबंधला पारितोषिक, ललित व ललितेतर ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वतप्रमाणित त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. त्याचा ISSN No. 2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु. जी. सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.

वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, आणि आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे, ता व जि. सातारा या संस्था एकमेकांसोबत सामंजस्य करार दि. ०८ जानेवारी २०२५ रोजी करत आहेत. या कराराची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दिष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबवणे.
२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.
४. निबंध, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.
५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.
६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबवणे.
७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.
८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.
९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.
१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे, ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.
११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**



PDF Scanner ACE Scanner

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणमध्ये सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.
४. त्रैमासिकाद्वारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.
५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करून विचारविनिमय करणे.
६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी**

१. आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.
२. परस्पर सामंजस्य करारातील अटींचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
३. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.
४.सदर परस्पर सामंजस्याचा कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.
५. परस्पर संमतीने आणखी पाच वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय**

१. सदर करारातील जबाबदारी समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य अथवा विभागप्रमुख काम करतील.
२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.
३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड
मराठी विभाग प्रमुख
**मराठी विभाग प्रमुख**
**आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज नागठाणे**

कॅप्टन डॉ. महेश गायकवाड
**प्रभारी प्राचार्य**
आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
नागठाणे, ता. व जि. सातारा

डॉ. मांतेश हिरेमठ
**सचिव व खजानीस**
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

डॉ. भरत जाधव
**अध्यक्ष**
अध्यक्ष
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

PDF Scanner ACE Scanner